Literacy for a Billion

Movie: Pashchatap
Year: 1981

Song: Angavar Shirshiri Ka Uthali
Lyricist: Jagdish Khebudkar

अंगांगावर शिरशिरी का उठली हो
तुला पाहता नजर अशी झुकली
अंगांगावर शिरशिरी का उठली हो
तुला पाहता नजर अशी झुकली
देही प्रेमलता फुलली हो
देही प्रेमलता फुलली
अंगांगावर शिरशिरी का उठली हो
तुला पाहता नजर अशी झुकली

चैत्रपालवी रानभरी झुलली गं
तुझविषयीची प्रीत उरी रुजली
चैत्रपालवी रानभरी झुलली गं
तुझविषयीची प्रीत उरी रुजली
देही प्रेमलता फुलली हो
देही प्रेमलता फुलली हो
अंगांगावर शिरशिरी का उठली हो
चैत्रपालवी रानभरी झुलली

भेट तुझी आज घडे
रानी एकांती
ओढ तुझी सये जुनी
जुळली गं नाती
भेट तुझी आज घडे
रानी एकांती
ओढ तुझी सये जुनी
जुळली गं नाती
सारी विरह व्यथा सरली
हो सारी विरह व्यथा सरली
अंगांगावर शिरशिरी का उठली हो
चैत्रपालवी रानभरी झुलली

हो रंग नवा गंध तुझा
संग मला देई
साथ तुझी हात तुझा
धीर मला देई
रंग नवा गंध तुझा
संग मला देई
हो साथ तुझी हात तुझा
धीर मला देई
सुखे सभोवती जमली
हो सुखे सभोवती जमली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*